अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## दिल्ली कॅपिटल्सने उघडले विजयाचे खाते, चेन्नई सुपर किंग्जच्या विजयी रथाला लागला ब्रेक



**चेन्नई :** चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात विशाखापट्टणम येथे आज डबल हेडरमधील दुसरा सामना खेळवला जात आहे. आयपीएलच्या १७व्या हंगामात ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपर किंग्ज संघाची विजयी घोडदौड सुरू आहे. चेन्नई संघाने सुरुवातीचे दोन्ही सामने जिंकले आहेत. तर दुसरीकडे, दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात मात्र पराभवाने झाली असून संघाला सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला आहे. चेन्नई सुपर किंग्ज संघ ४ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे, तर ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्स नवव्या स्थानावर आहे.

रविवारी आयपीएलच्या चेन्नई वि दिल्लीच्या सामन्यात गुरू-शिष्याची जोडी एकमेकांविरूद्ध खेळताना दिसणार आहे. ऋषभ पंत विरूद्ध धोनी अशी भिडंत पाहायला मिळणार आहे.



# दिलीप माने यांचा पक्षप्रवेश ही बदलाची सुरवात : पटोले



माजी आमदार दिलीप माने यांनी रविवारी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, सुरेश हसापूरे आदी उपस्थित होते.



काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर दिलीप माने रविवारी रात्री सोलापुरात परतले. त्यावेळी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी जल्लोषात त्यांचे स्वागत केले.

**दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी**

राज्यात सध्या बदलाचे वारे वहात असून सत्ताधाऱ्यांच्या हुकूमशाही कारभाराविरोधात जनतेत रोष आहे. संविधान आणि लोकशाही धोक्यात आणण्याचे काम सुरू आहे. त्याविरूध्द बदल घडवण्याची जनतेची मानसिकता आहे. या बदलाची सुरवात सोलापूरपासून होणार आहे त्याचे प्रत्यंतर माजी आमदार दिलीप माने यांच्या पक्ष प्रवेशाने आली आहे, असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केले.

माजी आमदार दिलीप माने यांनी त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह आज काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी देशाचे नेते सुशीलकुमार शिंदे, प्रदेश काँग्रेस कमिटीच्या महिला अध्यक्षा पल्लवी रेणके, काँग्रेस शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, कार्याध्यक्ष अॅड. नंदकुमार पवार, वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष सुरेश हसापुरे, शहर उपाध्यक्ष सुशील बंदपट्टे, विनोद भोसले, संजय हेमगड्डी, डॉ.पृथ्वीराज माने आदि मान्यवर उपस्थित होते.

पटोले म्हणाले, देशात विरोधी पक्षांना विकलांग करून एक पक्षीय राजवट आणण्याच्या दिशेने भारतीय जनता पक्ष वाटचाल करत आहे. आज आपल्या त्या विरोधात लढायचं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या संविधान रक्षणाचा लढा आहे. हे लक्षात घेऊन दिलीप माने यांच्यासारख्या नेत्याला काँग्रेस पक्षात प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.

माने यांनी काँग्रेस पक्ष प्रवेशाचा निर्णय घेतला. ही बदलाच्या वाऱ्याची सुरवात आहे. असे अनेक नेते अगामी काळात काँगेसच्या प्रवाहात येतील आणि संविधान वाचवण्याच्या मोहिमेचा भाग बनतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### कार्यकर्त्यांचे ऐकणारा जिल्ह्याचा नेता

माने यांना दक्षिण किंवा उत्तर मधून उमेदवारी द्या असे काही जण म्हणत आहेत. माने यांनी त्यांच्या कर्तृत्वाने जिल्ह्याचे नेते होण्याचा मान मिळवला आहे. त्यांनी आपण कोणत्या पक्षात जावे यासाठी कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली. कार्यकर्त्यांनी एकमुखाने त्यांना काँग्रेसमध्ये जाण्याचा सल्ला दिला. त्यामुळे त्यांनी या पक्षात येण्याचा निर्णय घेतला. कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकणारा नेता दुर्मिळ झाले आहेत. कारण हुकुमशाही वृत्ती नेत्यांमध्ये वाढत आहे, असे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी सांगितले.

शिंदे म्हणाले, भारतीय जनता पक्षाने प्रणिती शिंदे भाजपात घेण्यासाठी खूप प्रयत्न केले त्यावेळी प्रणीती शिंदे यांनी उत्तर दिले काँग्रेस माझ्या रक्तात आहे. माझी मुलगी म्हणून नव्हे तर काँग्रेसच्या विचारधारेवर ठाम निष्ठा असणाऱ्या उमेदवाराच्या मागे ठामपणे उभे राहण्याचा निर्णय दिलीपराव माने यांनी घेतला, हे अभिनंदन करण्याजोगे आहे.

दिलीप माने यांनी सांगितले की, कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी काँग्रेस पक्षात म्हणजेच स्वगृही परतण्याचा निर्णय घेतला. माझ्या सहकारी प्रणिती शिंदे यांना विजयी करण्यासाठी मी जीवापाड प्रयत्न करेन आमचे सर्व कार्यकर्ते पक्षप्रवेशाचा निर्णय झाल्यानंतरच त्यांच्या प्रचाराच्या कामात सहभागी झाले आहेत. पक्ष प्रवेशाच्या मुहूर्ताची त्यांनी वाट पाहिली नाही.

### सभागृह भरले; कार्यकर्त्यांनी आवार फुलले

टिळक भवनमधील पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमासाठी असणारे सभागृह कार्यकर्त्यांनी भरून गेल. त्यानंतर सोलापुरातून गेलेल्या शेकडो कार्यकर्त्यांच्या गर्दीने टिळक भवनचे आवार फुलून गेले होते. माने यांच्यावरील कार्यकर्त्यांचे प्रेम पाहून नाना पटोले सभागृहात येताना म्हणाले, एवढ्या मोठ्या संख्येने कार्यकर्ते येणार असतील हा सोहळा शिवतीर्थावर घ्यायला हवा होता. या गर्दीतून मला माने यांच्यावरील कार्यकर्त्यांचे प्रेम आणि प्रणिती शिंदे यांच्या विजयाचा निश्चय जाणवत आहे.

देशाच्या संविधानपुढे संकट असताना आम्ही गप्प राहू शकत नाही. त्यामुळे आम्ही काँग्रेसमध्ये येण्याचा निर्णय घेतला. कार्यकर्त्यांच्या मनातही देशाला वाचवण्याची भावना होती. त्यामुळे त्यांनी मला तशी सुचना केली, असेही माने यांनी आवर्जून सांगितले.

यावेळी सिद्धेश्वर कारखान्याचे संचालक सिद्धाराम व्हनमाने, माजी संचालक बाळासाहेब बिराजदार, जिल्हा परिषद माजी सदस्य आप्पासो काळे, माजी उपसभापती संभाजी भडकुंबे, मार्केट कमिटीचे उपसभापती चंद्रकांत खूपसंगे, बाळासो पाटील, ब्रह्मदेवदादा माने बँकेचे चेअरमन सोमनाथ गायकवाड, संचालक गंगाधर बिराजदार, सचिन चौधरी, तानाजी सिनगारे, शावरु वाघमारे, शिवाजी पाटील, खरेदी-विक्री संघाचे व्हा.चेअरमन मुरलीधर शिंदे, संचालक रवींद्र शिंदे, नितीन भोपळे, प्रताप टेकाळे, सरपंच बालाजी येलगुंडे, गोवर्धन जगताप, बाळासाहेब पाटील, हरिचंद्र राठोड, उमेश भगत, अरुण बिराजदार, नागेश बिराजदार, प्रथमेश पाटील, दक्षिण सोलापूर युवक काँग्रेस अध्यक्ष महेश जोकारे रवी राठोड, रावसो पाटील, राम गायकवाड, इरण्णा पाटील, जगदेव अटकर, संजय जाधव, हरिचंद्र राठोड, राहुल देवकते, राजू गंगदे, गुरुनाथ कोटलगी, विकास पाटील, सचिन गुंड, इरेशा कोळी, श्रीशैल पाटील, भंडारकवठेचे माजी सरपंच चिदानंद कोटगोंडे, बापूराव पाटील निखिल देशपांडे, शकील कुडले, सिद्धारूढ घेरडी, महादेव नरोणे, प्रमोद शिंदे, अंबादास कोळी, निंबर्गीचे उपसरपंच पीरसाब लवगिचे माजी सरपंच अप्पासाहेब पाटील, हवालदार, विशाल भोसले, रेवणसिद्ध साखरे, रमजान नदाफ, भरत आकेन, व्यंकटेश पोतु, श्रीकांत मेलगे पाटील, महे घाडगे, रवी कांबळे, प्रवीण साबळे, युवराज चव्हाण, अंतू देठे, विठ्ठल म्हत्रे, रणजित दवेवाले, नागेश म्हत्रे, राजशेखर पाटील, हनमंत मोतीबने, शाम पाटील, शिवलिंगगौडा पाटील, पृथ्वीराज माने युवा मंचचे अध्यक्ष सुनील जाधव, अजय सोनटक्के, डॉ.अजित पाटील, ओंकार जावीर, अजय रेवजे, गणपत बचुटे, सुनील पाटील, नानासाहेब पवार, जैनु शेख आदीसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### सपाटेंच्या पराभवासाठी खोटी बातमी दिल्याच्या आरोप रद्द

# महेश कोठेंची निर्दोष मुक्तता

**सोलापूर/प्रतिनिधी**

२००९ च्या शहर उत्तर विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार मनोहर गणपत सपाटे यांचा पराभव करण्याच्या उद्देशाने तात्कालीन काँग्रेस उमेदवार महेश विष्णूपंत कोठे आणि संपादक दिलीप दादाराव शिंदे यांनी संगनमत करुन सपाटेंनी कोठे यांना पाठिंबा दिल्याची बातमी प्रसिद्ध केल्याच्या आरोपातून माजी महापौर महेश कोठेंसह दिलीप शिंदे यांची प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी प्रशांत वराडे यांनी निर्दोष मुक्तता केली.

२००९च्या विधानसभा निवडणूकिमध्ये शहर उत्तर मतदार संघातून काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून तात्कालीन काँग्रेसचे महेश कोठे हे निवडणूक रिंगणात असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोहर सपाटे यांनी बंडखोरी करुन अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला होता. तेव्हा निवडणूकिच्या पूर्वसंध्येला म्हणजे दि. १२ डिसेंबर २००९ रोजी संध्याकाळी ७ वाजता मतदारांची दिशाभूल करुन सपाटेंना पराभूत करण्याकरिता महेश कोठे व वृत्तपत्र संपादक दिलीप शिंदे यांनी 'अर्थपूर्ण' संगनमत करून नालंदा एक्सप्रेस या वृत्तपत्रात अखेर महेश कोठे यांना मनोहर सपाटे यांचा पाठिंबा? या मथळ्याखाली वृत्त छापले. ते वर्तमानपत्र मतदारसंघात वितरीत केले, अशा आशयाची फिर्याद मनोहर सपाटे यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिल्यावरुन कोठे व शिंदे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदला होता. गुन्ह्याचा तपास तात्कालीन सहा.पो.नि. बाळासाहेब भालचीम यांनी केला. न्यायालयात मनोहर सपाटेंसह ९ साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. कोठे व शिंदे या दोन्ही आरोपींविरुद्ध करण्यात आलेले आरोप बिनबुडाचे व खोटे असून त्यांचा एकमेकांशी संबंध नाही. मतदारांची सहानुभूती मिळविण्याकरिता अपक्ष उमेदवाराने खोटी फिर्याद दिल्याचा युक्तिवाद अॅड. आल्हाद अंदोरे व अॅड. अथर्व अंदोरे यांनी केला. ग्राह्य मानून न्यायाधिशांनी महेश कोठे व दिलीप शिंदे या दोघांची निर्दोष मुक्तता केली. राजकिय क्षेत्रात गाजलेल्या या खटल्यात दोन्ही आरोपींतर्फे अॅड. आल्हाद अंदोरे व अॅड. अथर्व अंदोरे यांनी काम पाहिले. तर सरकारतर्फे अॅड.जे. व्ही. चेळेकर यांनी काम पाहिले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




'विषय' काढला की ते मैत्री करतात!

# आमच्या घरातील लग्न! निमंत्रणाची गरज नाही : खरटमल

### शरदचंद्र पवार गटाची बैठक; आ. शिंदे यांना विजयी करण्याचा निर्धार

**सोलापूर/प्रतिनिधी**

शरद पवार आमचे नेते आहेत. त्यांच्या आदेश आमच्यासाठी महत्वाचा आहे. आमच्या घरातील लग्न आहे, आम्हाला बोलावण्याची गरज नाही, असे सांगत शरदचंद्र पवार गटाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार आ. प्रणिती शिंदे यांना या निवडणुकित विजयी करण्यासाठी नेटाने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्यावतीने रविवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी खरटमल बोलत होते. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रवक्ते एड. यू. एन. बेरिया, माजी महापौर महेश कोठे, मनोहर सपाटे, प्रमोद गायकवाड आदींची उपस्थिती होती. खरटमल पुढे म्हणाले,

### शहर उत्तरमधून आम्ही मायनस जाणार नाही

आमच्या पक्षाची बैठक मंगळवारी बोलवली आहे. आम्ही आमची रणनिती काय आहे, कार्यकर्ते काय करणार आहेत, कुठे बुथ यंत्रणा लावणार आहोत, ही माहिती काँग्रेसला देणार आहोत. त्यानंतर ते निणर्य घेतील. मात्र शहर उत्तरची जबाबदारी आपल्याकडे असो वा काँग्रेसकडे यंदा उत्तरमधून आम्ही मायनस जाणार नाही, असे महेश कोठे यांनी सांगितले.

शरद पवार यांच्या आदेशानुसार सर्व पदाधिकारी कार्यकर्ते काम ाला लागले आहेत. बैठका घेऊन प्रचाराचे नियोजन करण्यात येत आहे. जी जबाबदारी देण्यात आली आहे ती सक्षमपणे पार पाडण्यात येणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पक्षाचे सर्व जेष्ठ नेते, सर्व पदाधिकारी, सर्व फ्रंटलचे व सेल चे पदाधिकारी तसेच पक्षाचे सर्व सदस्य व कार्यकर्त्यांची बैठक मंगळवार दि.२ एप्रिल रोजी सायंकाळी बेरिया हॉल येथे आयोजित केली आहे. या बैठकीत निवडणुकीची रणनिती ठरविण्यात येणार असल्याचे अॅड. बेरिया यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस माजी महापौर नलिनी चंदेले, जनार्दन कारमपुरी, भारत जाधव, शंकर पाटील, प्रशांत बाबर, चंद्रकात पवार आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.








